

# अजिंठा

रोटरी मातृसन्मान विशेषांक... २०२६

दिनांक १५ मे २०२६




Rtn. Francesco Arezzo
Rotary International President



Rtn. Dnyaneshwar Shewale
District Governor RID 3030



Rtn. Girish Kulkarni
President



Rtn. Subaassh Amalnearkar
Hon. Secretary



Rtn. Capt. Mohan Kulkarni
Bulletin Chairman & Editor


Rotary | UNITE FOR GOOD

ROTARY CLUB JALGAON

R. I. Dist. 3030 | Club No. 15512 | RIY : 2025-26

Estd. 6th February 1950


## संपादकीय...

मे महिन्यातील दुसरा रविवार हा जागतिक मातृदिन (मदर्स डे) म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. त्यानिमित्ताने १० मे २०२६ रोजी आपल्या रोटरी क्लब जळगावतर्फे एक अतिशय सुंदर आणि हृद्य उपक्रम राबवण्यात आला. क्लबमधील सदस्यांच्या घरी जाऊन त्यांच्या आईंचा सन्मान करायचा. रो. गिरीश यांची ही कल्पना अतिशय सुंदर, योग्य आणि या मातृदिनाच्या निमित्ताने अतिशय चपखल बसणारी ठरली.

यात सत्कार करावयाचा आपल्याच क्लबच्या सदस्याने सपत्नीक जाऊन सत्कारमूर्ती आईस शाल, एक स्मृतिचिन्ह, एक पोस्ट कार्ड असे देऊन, त्यांच्याशी गप्पा मारुन, त्यांची थोडी माहिती विचारून, त्यांनी कुटुंबासाठी, समाजासाठी दिलेल्या योगदानाबद्दल ऋण व्यक्त करणे अशा प्रकारे एकूण उपक्रम होता.

त्याबद्दल आपल्या सदस्यांना आलेला अनुभव त्या त्या मातोश्रींच्या प्रतिक्रिया याबद्दल सगळा फोटोसहित वृत्तांत देण्यासाठी एक खास वेगळा अजिंठा बुलेटीनचा रोटरी मातृसन्मान विशेष अंक काढावा असे ठरले. या नाविन्यपूर्ण उपक्रमाची माहिती व झलक या अंकात आपणास वाचावयास मिळेल आणि हा अंक आपणास नक्कीच आवडेल याची खात्री आहे.

सुप्रसिद्ध ज्येष्ठ कवी माधव ज्युलियन यांची अजरामर कविता "प्रेमस्वरूप आई, वात्सल्यसिंधू आई..." ही आज सर्वांच्याच हृदयात घर करुन बसली आहे. या निमित्ताने साने गुरुजी यांची श्यामची आई आठवणार नाही हे शक्यच नाही.

**–रो. कॅप्टन मोहन कुलकर्णी**

## अध्यक्षीय मनोगत...

आई...
हा शब्द उच्चारताच मायेचा, त्यागाचा, संस्कारांचा आणि नि:स्वार्थ प्रेमाचा अखंड झरा आपल्या मनात उभा राहतो. भारतीय संस्कृतीमध्ये मातृशक्तीला सदैव सर्वोच्च स्थान देण्यात आले आहे. समाजातील प्रत्येक संवेदनशील, सुसंस्कृत आणि सेवाभावी व्यक्तिमत्त्वामागे एका आईचे संस्कार आणि आशीर्वाद असतात, ही भावना मनामध्ये ठेवून रोटरी क्लब जळगावतर्फे "रोटरी मातृसन्मान – एक भेट... कृतज्ञतेची..." हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमामध्ये रोटेरियन सदस्यांनी सपत्नीक इतर सदस्यांच्या घरी जाऊन त्यांच्या मातोश्रींशी संवाद साधला, त्यांचा जीवनप्रवास, संघर्ष, मूल्ये आणि संस्कार जाणून घेतले. हा कार्यक्रम भारतीय कुटुंबव्यवस्था, संस्कार आणि कृतज्ञतेचा एक भावस्पर्शी उत्सव होता.

या भेटींमधून प्रत्येक सदस्याला जीवन समृद्ध करणारे अनुभव मिळाले. मातांच्या चेहऱ्यावरील समाधान, त्यांच्या डोळ्यांतील प्रेम आणि दिलेले आशीर्वाद हीच या उपक्रमाची खरी कमाई ठरली.

"अजिंठा"च्या या विशेषांकाद्वारे त्या सर्व मातृशक्तींप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा छोटासा प्रयत्न...

आईच्या चरणीच दडलेले असते
संस्कारांचे खरे विद्यापीठ...
तिच्या आशिर्वादाच्या बळावरच
मिळते जीवनाला कृतार्थतेचे सौंदर्य...

**– गिरीश कुळकर्णी**

## प्रतिक्रिया

# मातृसन्मानातून घडलेले रोटरीचे खरे दर्शन

रोटरी क्लब जळगावचा **रोटरी मातृसन्मान - एक भेट... कृतज्ञतेची...** उपक्रम वाचून मन भारावून गेले. हा कार्यक्रम रोटरीच्या 'सेवा' या मूल्याचा गाभा शोधणारा प्रवास होता.

आपण नेहमी रोटरीचे प्रकल्प, डोनेशन, हेल्थ कॅम्प यावर बोलतो. पण रोटरीचे खरे बळ केवळ सेवाकार्यात नाही, तर त्या मागे उभ्या असलेल्या मातृशक्तीच्या संस्कारांत आहे. समाजसेवा करण्यासाठी घरातूनच संस्कार मिळावे लागतात. ज्या आईने दुसऱ्याला देत राहा हा मंत्र दिला, तिच्यामुळेच आज रोटेरियन समाजासाठी झटतो. जळगाव क्लबने या मूळ स्रोताला जाऊन नमन केले, हे अत्यंत स्तुत्य.

आजच्या धावपळीच्या युगात आपण शेजाऱ्यालाही ओळखत नाही. अशा वेळी रोटरीचे सदस्य सपत्नीक दुसऱ्या सदस्याच्या घरी, त्याच्या आईला भेटायला जातात ही गोष्ट फेलोशिप या रोटरीच्या दुसऱ्या उद्देशाची खरी व्याख्या आहे. ९५



वर्षांच्या आजींचे हास्य व १०४ वर्षांच्या वडिलांचे आशीर्वाद घेणे, यातून पैशाने विकत न घेता येणारी श्रीमंती मिळते. हा उपक्रम रोटरीला 'कुटुंब' बनवतो.

आईला शाल, स्मृतिचिन्ह आणि हस्तलिखित पत्र देत आपण भारतीय संस्कृतीचा गोडवा जपला. व्हॉट्स ॲपवर 'Happy Mother's Day' पाठवणे सोपे आहे. पण वेळ काढून, प्रत्यक्ष घरी जाऊन, हाताने लिहिलेले पत्र देणे यात जी आपुलकी आहे तीच खरी कृतज्ञता. प्रतिकूल परिस्थितीत संसार उभा करणाऱ्या मातांची कहाणी ऐकणे, म्हणजे उद्याच्या पिढीसाठी 'संघर्ष' या शब्दाचा अर्थ समजून घेणे होय.

हा उपक्रम इतर १००+ क्लब्ससाठी एक 'टेम्प्लेट' आहे. रक्तदान शिबिरे महत्वाचीच, पण त्यासोबत 'भावनिक जडणघडणीचे' असे उपक्रम झाले तर रोटरीचे काम अधिक खोलवर रुजेल. कारण समाजसेवेचा उत्साह टिकवून ठेवायचा असेल, तर कार्यकर्त्याच्या घरातून प्रेरणा मिळणे गरजेचे आहे. आणि ती प्रेरणा 'आई' शिवाय कोण देणार?

रोटरी क्लब जळगावने 'Mother's Day' साजरा केला नाही, तर 'Mother's Value' अधोरेखित केली. हा उपक्रम वाचून डोळ्यांत पाणी आणि चेहऱ्यावर हसू एकाच वेळी येते. प्रेसिडेंट गिरीश कुळकर्णी आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक अभिनंदन.

खरंच, ज्या घरात आई सुखी, त्या घरात रोटरी नक्कीच पोहोचते. कारण सेवा करणारी हातं घडवणारी पहिली शाळा 'आई'च असते. जय रोटरी, जय मातृशक्ती!

**प्रांतपाल नाना शेवाळे**

डिस्ट्रिक्ट 3030

## प्रतिक्रिया

रोटरी मातृसन्मान हा एक अतिशय चांगला प्रोजेक्ट आपण रविवारी घेतला. रोटरी अध्यक्ष गिरीशचं मनःपूर्वक अभिनंदन!

मी चार पाच लोकांशी बोललो. ज्यांच्याकडे आपले वेगवेगळे रोटेरियन्स गेले होते आणि सगळ्यांच्या प्रतिक्रिया खूप चांगल्या आहेत, खूप बोलक्या आहेत आणि सगळ्यांकडे त्यांच्या सन्मानित आईंना खरंच हे खूप आवडलं.
मला असं वाटतं की जे लोक वयोवृद्ध असतात त्यांना कोणीतरी आपल्याजवळ यावं, आपल्याशी बोलावं, आपल्याबरोबर गप्पा माराव्यात, आपण हे केलंच पण त्याचबरोबर त्यांचा जो सत्कार केला आणि रोटरी विषयी एक आपुलकी त्या फॅमिलीमध्ये या निमित्ताने निर्माण झाली याचा मला जास्त आनंद आहे.

माझ्या स्वत:च्या आईची प्रतिक्रिया फार छान होती. खरं म्हणजे इतक्या वर्षांपासून मी रोटरीमध्ये आहे, मध्यंतरी आपण एक-दोन वेळा प्रोजेक्ट केला होता ज्यात आपण आपल्या काही रोटेरीयन्सच्या घरी जायचो आणि त्यांच्याकडील वयस्कर लोकाशी गप्पा करायचो, पण पहिल्यांदा मला वाटते मातृदिनाच्या निमित्ताने हा जो काही प्रोजेक्ट घेतला हा अतिशय चांगला आणि उत्तम आहे आणि कुठेतरी एक खूप जास्त सकारात्मक संदेश त्यानिमित्ताने आपल्या क्लबमध्ये गेलाय.

आपल्या सदस्यांच्या घरापर्यंत पोहचलाय यासाठी या सगळ्या टीमच आणि विशेषतः प्रेसिडेंटच कौतुक आणि अभिनंदन !

**पीपी रो. प्रेम कोगटा**

खुप ह्दयस्पर्शी व संवेदनशील. केवळ अभिनंदन म्हणणे त्या भावनांची योग्य कदर ठरणार नाही.

**पीपी सीए अनिलकुमार शहा**



जागतिक 'मदर्स डे' निमित्ताने आपले सदस्य ॲड. महेश भोकरीकर यांच्या मातोश्री सौ. मथुरा रघुनाथ भोकरीकर यांची त्यांच्या घरी भेट घेणे ही अत्यंत आनंददायी आणि समृद्ध करणारी अनुभूती ठरली.

मातृस्नेहाचा अनोखा स्पर्श, त्यांच्या सहवासातील शांतता व त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील करुणामय तेज मनाला भिडणारे होते.

या भेटीमुळे 'रोटरी मातृसन्मान' या उपक्रमाचा खरा अर्थ अधिक सशक्त झाला.

मातोश्रींच्या सहवासात अनुभवलेली ऊब, त्यांचे मार्गदर्शन, आणि मातृत्वातील निरलसता यामुळे या उपक्रमामागील मूल्ये कृतज्ञता, आदर आणि संस्कार अधिक दृढ झाली.

**रो. ॲड. हेमंत भंगाळे.**

जागतिक 'मदर्स डे' निमित्ताने आपल्या क्लबचे संवाद सचिव रो. पंकज व्यवहारे यांच्या आई साहेबांना भेटण्याचा योग आला. मी आणि शमा हिने त्यांच्याशी खुप गप्पा मारल्यात त्याना मातृदिनाच्या शुभेच्छा दिल्यात आणि त्यांचा आशीर्वाद घेतला. महत्वाचे म्हणजे सुवर्णा आई गाणं उत्तम गातात, या अगोदरही त्यांच्याशी गाण्याबद्दल बोलणे झाले होते. आजही तो विषय आवर्जून निघाला.. त्यांना गाण्याची उत्तम जाण आहे, शमानेही त्यांच्या जीवन प्रवासाविषयी जाणून घेतले. पंकजचे वडील स्टेट बँकेत असल्यामुळे कशी त्यांची फिरस्ती झाली, ते त्यांनी रंजकतेने सांगितले, असे खुप बोलणे झाले, त्यांना शाल, एक उत्तम फ्रेम आणि पत्र दिले. मग पापडाच्या लाट्या, चिवडा आणि आईस्क्रीम असे खाणे झाले. पुनःश्च त्यांचा आशीर्वाद घेतला आणि आम्ही दोघ मार्गस्थ झालो.

**रो. सुबोध सराफ**



## प्रतिक्रिया

### अत्यंत सुंदर, हृदयस्पर्शी आणि संस्कारमय उपक्रम!

“रोटरी मातृसन्मान” हा केवळ Mother's Day साजरा करण्यापुरता मर्यादित न राहता मातृशक्तीप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा भावनिक सोहळा ठरला. घराघरातील मातांच्या अनुभवांनी, आशीर्वादांनी आणि प्रेमाने रोटरी परिवार अधिक समृद्ध झाला. अशा उपक्रमांमुळे नात्यांमधील जिव्हाळा आणि भारतीय संस्कृतीतील मातृत्वाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. विशेष म्हणजे अध्यक्ष गिरीश कुळकर्णी यांनी संपूर्ण वर्षभर रोटरीमध्ये अशाच नाविन्यपूर्ण, संस्कारमूल्य जपणाऱ्या आणि समाजमनाला स्पर्श करणाऱ्या उपक्रमांची सुंदर परंपरा निर्माण केली, त्याबद्दल त्यांचे विशेष कौतुक! संस्कार, संवेदना आणि भारतीय कुटुंबव्यवस्थेचा सुंदर उत्सव घडवून आणल्याबद्दल रोटरी क्लब जळगावचे अध्यक्ष गिरीश कुलकर्णी यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

**पीपी रो. जितेंद्र ढाके**
**प्रेसिडेंट जळगाव एन्क्लेव्ह**

### मनाला भावलेला उपक्रम

रोटरी मातृसन्मान... एक भेट... कृतज्ञतेची" मनाला भावणारा असा उपक्रम रोटरी जळगावने राबवलाय. सर्व सभासदांना ह्या मायेच्या धाग्याने एकत्र गुंफण्याचा विचारच खरोखर स्तुत्य आहे. आयुष्याच्या उत्तरार्धात आपली दखल घेतली जाणं, आवर्जून भेटायला येणं, ही मनाला आनंद देणारी गोष्ट आहे. आनंदाचं मोल करता येत नाही आणि म्हणूनच मातृदिनाच्या दिवशी जळगाव रोटरीने आपल्या सभासदांना दिलेल्या ह्या भेटीचं वेगळेपण



मनाला भावतं. फेलोशिप, अटेंडंस, मेंबरशिप वर अतिशय चांगला, सकारात्मक परिणाम करणारा हा उपक्रम. अध्यक्ष रो. गिरीश कुळकर्णी आणि टीम जळगाव रोटरी चे मनापासून अभिनंदन...

**पीपी रो. डॉ. अपर्णा भट-कासार, असिस्टंट गव्हर्नर**



रो. प्रेम कोगटा यांच्या मातोश्री नर्मदाबाई कोगटा यांचा कृतज्ञता सन्मान करतांना दिपीका दिपक चांदोरकर व प्रविणा केदार मुंदडा



पीडीजी रो. डॉ. चंद्रशेखर सिकची यांच्या पत्नी सौ. पुष्पलता सिकची यांचा कृतज्ञता सन्मान करतांना अध्यक्ष रो. गिरीश कुळकर्णी रो. संदीप शर्मा व रो. राकेश चव्हाण



रो. किशोर मंडोवरा यांच्या मातोश्री यशोदाबाई मंडोवरा यांचा कृतज्ञता सन्मान करतांना फर्स्ट लेडी सौ. आदिती गिरीश कुळकर्णी, रो. राकेश चव्हाण व परिवार सदस्य



रो. कंवरलाल संघवी यांच्या पत्नी सौ. विजया संघवी यांचा कृतज्ञता सन्मान प्रसंगी फर्स्ट लेडी सौ. आदिती गिरीश कुळकर्णी, रो. राकेश चव्हाण व परिवार सदस्य



आयपीपी रो. ॲड. सागर चित्रे यांच्या मातोश्री अखतर चित्रे यांचा कृतज्ञता सन्मान करतांना अध्यक्ष रो. गिरीश कुळकर्णी व रो. सानिया चित्रे



रो. संध्या महाजन यांच्या कृतज्ञता सन्मान प्रसंगी अध्यक्ष रो. गिरीश कुळकर्णी फर्स्ट लेडी सौ. आदिती कुळकर्णी, रो. राकेश चव्हाण व रो. संदीप शर्मा



स्वर्गीय रो. डॉ. किशन काबरा यांच्या पत्नी सुमन काबरा यांच्या कृतज्ञता सन्मान प्रसंगी
रो. संदीप काबरा अध्यक्ष रो. गिरीश कुळकर्णी, सौ. आदिती, रो. संदीप शर्मा, रो. राकेश चव्हाण



पीपी रो. पुनम मानुधने यांच्या कृतज्ञता सन्मान प्रसंगी अध्यक्ष रो. गिरीश कुळकर्णी,
सौ. आदिती, रो. संदीप शर्मा, रो. राकेश चव्हाण, रो. रितेश जैन



पीपी रो. राजेश वेद यांच्या मातोश्री दमयंती बेन यांच्या कृतज्ञता सन्मान प्रसंगी
अध्यक्ष रो. गिरीश कुळकर्णी, रो. विजय जोशी, सौ. मयुरा जोशी व सौ. वनिता वेद



रो. जय अनिलकुमार शहा यांच्या मातोश्री सौ. स्नेहल शहा यांच्या कृतज्ञता सन्मान प्रसंगी
सौ. मयुरा, रो. विजय जोशी, अध्यक्ष रो. गिरीश कुळकर्णी, रो. प्रदीप खिंवसरा,



रो. राजेश यावलकर यांच्या मातोश्री सौ. शांता कमलाकर वाणी यांच्या
कृतज्ञता सन्मान प्रसंगी रो. योगेश गांधी व रो. प्रदीप खिंवसरा



रो. विश्वजीत बऱ्हाटे यांच्या मातोश्री सौ. नीता हरीश्चंद्र बऱ्हाटे
यांच्या कृतज्ञता सन्मान प्रसंगी रो. निलेश झोपे



अध्यक्ष रो. गिरीश कुळकर्णी यांच्या मातोश्री सुनंदा कुळकर्णी यांच्या कृतज्ञता सन्मान प्रसंगी
पीपी रो. डॉ. जयंत व सौ. माधुरी जहागीरदार, प्रोजेक्ट चेअरमन रो. संदीप शर्मा



रो. रितेश जैन यांच्या मातोश्री सौ. ललिता जिवनलाल जैन यांच्या कृतज्ञता सन्मान प्रसंगी
फर्स्ट लेडी आदिती कुळकर्णी , ॲनेट हर्षाली व विश्व



रो. सुधीर पाटील यांच्या मातोश्री विजया पाटील यांच्या कृतज्ञता सन्मान प्रसंगी
संवाद सचिव रो. पंकज व सौ. वृषाली व्यवहारे



फर्स्ट लेडी सौ. आदिती कुळकर्णी यांना मदर्स-डे निमित्ताने
शुभेच्छा देतांना कुमारी अनिका मानुधने



रो. त्रिभुवन शाह यांच्या ९४ वर्षीय मातोश्री सौ. लक्ष्मीबेन शाह यांच्या कृतज्ञता सन्मान प्रसंगी श्री. हिरालाल शाह, अध्यक्ष रो. गिरीश कुळकर्णी ,
पीपी रो. अशोक व सौ. वृषाली जोशी, रो. रितेश जैन, रो. राकेश चव्हाण व फर्स्ट लेडी सौ. आदिती कुळकर्णी



जागतिक 'मदर्स डे' निमित्ताने ॲड. हेमंत भंगाळे यांच्या मातोश्री कविता अरविंद भंगाळे आणि सासुबाई सरला चंद्रकांत राणे यांची त्यांच्या घरी जाऊन हृद्य भेट घेणे ही अत्यंत भावस्पर्शी आणि समृद्ध करणारी अनुभूती ठरली. घरातील स्नेहपूर्ण वातावरण, त्यांच्या प्रेमळ स्वागतातील आत्मीयता आणि संवादातून उमटणारे जीवनमूल्यांचे तेज मनाला विशेष भिडले.

दोन्ही मातोश्रींचा शाल व मोमेंटो देऊन सन्मान करताना त्यांच्या कर्तृत्वाची, त्यागाची आणि कुटुंबासाठी दिलेल्या अमूल्य योगदानाची जाणीव अधिक दृढ झाली. त्यांच्या चेहऱ्यावर दिसलेला समाधानाचा भाव आणि दिलेला आशीर्वाद हा खऱ्या अर्थाने सर्वात मोठा मातृसन्मान होता,त्यांचा सन्मान म्हणजे रोटरीच्या सेवाभावी भावनेला अधिक संवेदनशील व माणुसकीने समृद्ध करणारा उपक्रम.

**पीपी रो. ॲड. प्रविणचंद्र जंगले**



आजच्या अफलातून उपक्रमात सहभागी होण्याचा योग मिळाला, त्याबद्दल गिरीशभाऊंचे हार्दिक आभार. आमची भेट होती... माजी अध्यक्ष नित्यानंद पाटील ह्यांच्या घरी. सौ.अस्मिता वहिनीच्या आईंचे आशीर्वाद घ्यायला मी व सौ. सीमा गेलो होतो. सर्व पाटील परिवाराने हृद्य स्वागत केले. चार पिढ्या हॉल मध्ये उपस्थित होत्या. अतिशय आनंदी वातावरण. आईच्या चेहऱ्यावर उत्साह ओसंडून वाहत होता. पहिलीच भेट आहे असे अजिबात वाटत नव्हते. त्यांचे बालपणीचे किस्से.. पुरोगामी विचारसरणीत... तत्कालीन परिस्थितीमध्ये पण उच्च शिक्षणासाठी केलेली धडपड, गायनाची जोपासलेली आवड, प्रतिकूल परिस्थितीमध्ये, सकारात्मक दृष्टी ठेवून मुलांचा केलेला सांभाळ.... सगळा जीवन प्रवास थक्क करणारा आहे.

अशा व्यक्तिमत्वाचा जीवन परिचय जवळून बघायला मिळाला. त्यांच्या गायनाचा पण आस्वाद मिळाला.

**रो. प्रदीप खिंवसरा**



जागतिक मातृदिनाच्या निमित्ताने मनोज जोशीच्या मातोश्री श्रीमती अनिताताई जोशी व सासूबाई श्रीमती श्रद्धाताई पाठक यांची घरी जाऊन भेट घेतली... खूप छान वाटलं...

मनोज, विनया यांनी खूपच अगत्याने स्वागत केले.. त्यांचे नवीन घर तर खूपच छान आहे. दोन्ही मातोश्रींशी चांगल्या गप्पा झाल्या..त्यांचे आशिर्वाद मिळाले ही आमची आजची कमाई . या उपक्रमाचे त्यांनीही कौतुक केले....

**पीपी रो. कॅप्टन मोहन कुलकर्णी**

रोटरी मातृसन्मान या उपक्रमात सक्रिय सहभाग घेता आला याचा एक वेगळाच अनुभव व आनंद घेता आला.
मातृशक्ती अनुभवता आली. वयाच्या ९५ व्या (age is just a number) वर्षी स्पेशल आपल्याला भेटायला येणाऱ्यास आपण छान साडी नेसून भेटू ही भावनाच किती गोड पद्धतीने आजी नातीला सांगते. यात आजी नातीचे bonding दिसते. दोघी एकमेकींचे कौतुक करत होत्या.
आपला छंद कसा जीवापाड जपावा. आपली नातवंडे दुधावरची साय कशी जपावी तीच आपली संपत्ती असं म्हणणारी आजी. आयुष्यभर कुटुंबासाठी आनंदाने कर्तव्य पार पाडुन आता छान आनंदात आपल्या संस्कृतीत सांगितल्याप्रमाणे वानप्रस्थाश्रमातील माता भेटल्या.
प्रत्येक जण वेगळी पण एक समान धागा होता तो समाधानाचा व पुढील पिढीच्या कौतुकाचा...

सगळ्यांना भेटून खुपच सकारात्मक ऊर्जा मिळाली. रोटरीचे आभार त्यांच्याकडून संधी मिळाली. धन्यवाद !

**सौ. आदिती कुळकर्णी, फर्स्ट लेडी**



आज जागतिक मदर्स डे च्या निमित्ताने आपले सदस्य रो प्रदिपजी खिवसरा सरांच्या मातोश्री श्रीमती पुष्पलता खिवसरा ह्यांचे मला व डॉ काजल ह्यांना आशीर्वाद घेण्याची संधी मिळाली. अतिशय साधे राहणीमान व उच्च विचारसरणी ह्या व्यक्ती मत्त्वाने आम्ही दोन्ही भारावून गेलो. अतिशय दिलखुलास गप्पा झाल्यात . आईंशी बोलताना - गाव हे खेडे असले तर चालेल पण घर हे खेडे असायला नको हे त्यांनी सांगितले. सौ सिमा भाभींचा आग्रहाचा स्वादिष्ट नाश्ता. निघताना आईनी काजल ला सांगितले की तुला आता जळगांवताच अजून एक माहेर मिळाले. अध्यक्ष गिरीश जी अतिशय स्तुत्य उपक्रम...

**पीपी रो. डॉ. तुषार फिरके**
**डिस्ट्रीक्ट सेक्रेटरी - ओसीव्ही**





आज का मातृ वंदन दिवस को अपने रोटरी क्लब ने अध्यक्ष गिरीश जी कुलकर्णी की विविधता पूर्ण कल्पना शक्ति से अति उत्कृष्ट रूप से मनाया. आज सभी रोटरी मेंबर ने सक्रिय रूप से सहभागी हुए और बड़ा उत्साह पूर्ण वातावरण हो गया है.
हमें अपने रोटरी मेंबर कमलेश भाई चांदवानी जी की मातोश्री व पिताश्री को मिलने का सौभाग्य प्राप्त हुआ. उनकी माताजी आध्यात्मिक विचारों की मैडिटेशन में गहरी जानकारी की धनी हैं. बड़ी आत्मीयता से संवाद किया.
हमारे लिए भी ये चिरस्मरणीय हो गया है. हृदय की गहराइयों से धन्यवाद

**पीपी रो. सुरेश केसवाणी**

## प्रतिक्रिया

रोटरीची खरी मजा दरवर्षी बदलत जाणाऱ्या अध्यक्षांमुळे असते. दरवर्षी नवीन अध्यक्ष, नवीन अध्यक्षांचा नवीन दृष्टिकोन आणि त्यातून पुढे येणाऱ्या नवनवीन कल्पना! यावर्षी आपण अशाच अनेक नवीन कल्पनातून पुढे आलेले नवनवीन प्रकल्प पहात आहोत. मातृदिनानिमित्त आपल्या क्लबने साजरा केलेला सोहळा हा असाच एक नाविन्यपूर्ण प्रोजेक्ट. घरातील वडिलधाऱ्या मातांना भेटून त्यांच्याशी गप्पा मारत त्यांचा सत्कार करणे ही सुंदर कल्पना आहे. त्यामुळे संपूर्ण कुटुंबाला रोटरी विषयी अधिक माहिती तर झालीच पण त्यांची रोटरी विषयी आत्मियता वाढली. अशा सुंदर प्रोजेक्टचा विस्तार समाजातील रोटरी व्यतिरिक्त वयस्कर मातांसाठी कसा करता येईल याचाही आपण विचार करायला हवा.

**पीपी रो. डॉ. प्रदीप जोशी**

रोटरी क्लबच्या मातृसन्मान उपक्रमाने खऱ्या अर्थाने आईच्या त्यागाला आणि समर्पणाला सलाम केला. या उपक्रमात माझ्या आईचाही सहभाग होता आणि त्यांनाही हा अनुभव मनापासून आनंददायी वाटला. त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य सारे काही सांगून गेले. जिच्या पदराखाली आपण मोठे झालो, तिला सन्मानित करणे हे समाजाच्या संवेदनशीलतेचे प्रतीक आहे. असे उपक्रम दरवर्षी व्हावेत, हीच सदिच्छा!

**आयपीपी रो. ॲड. सागर चित्रे**

खरोखरच खूप सुंदर उपक्रम. गिरीशजी, बऱ्याच ठिकाणी मातृदिनाचे कार्यक्रम झालेत. तुमचा कार्यक्रम मात्र हटके झाला. सगळ्या मातृशक्तीला शत शत नमन ! गिरीशजी, जळगाव क्लबच्या सर्व सहकारी सदस्यांचे मनापासून अभिनंदन!

**पीपी रो. राजेश गढीकर,**
**डिस्ट्रीक्ट सेक्रेटरी - इव्हेंट**

*Very thoughtful and commendable activity.*

**PDG Rtn. Vishwas Sahasrabhojanee**

"रोटरी मातृसन्मान – एक भेट... कृतज्ञतेची..." या उपक्रमाचा वृत्तांत वाचताना डोळे नकळत पाणावले. २०११ मध्ये वयाच्या ९४ व्या वर्षी मला सोडून गेलेल्या माझ्या आईची प्रकर्षाने आठवण झाली. ९५ वर्षांच्या मातोश्रींचे निरागस हास्य, १०३ वर्षांच्या वडिलधाऱ्यांचे आशीर्वाद आणि संघर्षातून संसार उभा करणाऱ्या मातांच्या कथा वाचताना प्रत्येक ठिकाणी मला माझीच आई दिसत होती. या उपक्रमाला प्रत्यक्ष उपस्थित राहता आले नाही, याची खंत वाटली; पण त्याहून अधिक वेदना ही की, आज माझी आई असती तर तिचाही असा सन्मान झाला असता. तुमच्या शब्दांत, फोटोंमध्ये आणि त्या माऊलींच्या चेहऱ्यावरील समाधानात मला माझ्या आईचेच दर्शन घडले. रोटरीचा हा उपक्रम केवळ कार्यक्रम नव्हता, तर मातृत्व, संस्कार आणि कृतज्ञतेचा हृदयस्पर्शी उत्सव होता. अध्यक्ष रो. गिरीशजी आणि सर्व सहभागी सदस्यांचे मन:पूर्वक अभिनंदन !

**रो. सुभाष अमळनेरकर**
मानद सचिव